बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ५२ | बुधवार,दि.८ डिसेंबर २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# ओबीसी आरक्षणाच्या अध्यादेशाला स्थगिती, ओबीसी प्रवर्गातील जनतेत आक्रोश

## ओबीसी आरक्षण रद्द होण्यास राज्य सरकार जबाबदार-प्रकाश शेडगे

ओबीसींचे आरक्षण जे न्यायालयाने रद्द केले त्याची जबाबदारी ही राज्यातील महाविकास आघाडीची असून ओबीसी कल्याण विभागाने आपली जबाबदारी पार पाडली नाही.त्यातच जी ओबीसी उपसमिती नेमली गेली ती सुध्दा रद्द करुन सरकारने ओबीसींच्या जागेवरील नव्हे तर संपुर्णच निवडणुका पुढे ढकलायला हवे.सरकार ओबीसी आरक्षण देण्यास टाळाटाळ करत असेल तर आम्ही महाराष्ट्र बंद करु अशी प्रतिक्रिया ओबीसी जनमोर्च्याचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार प्रकाश अण्णा शेडगे यांनी दिली आहे.

## सर्वाधिक फटका अर्जुनी मोरगाव तालुक्याला

ओबीसी प्रवर्गाच्या जागांवर निवडणूक घेण्यास सवोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. याच निर्णयाच्या आधारावर राज्य निवडणूक आयोगाने ओबीसी प्रवर्गाच्या जागा वगळून निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या निर्णयाचा सर्वाधिक फटका अर्जुनी मोरगाव तालुक्याला बसला आहे. बोंडगावदेवी, केशोरी, महागाव, माहुरकुडा, इटखेडा या पाच जि.प.च्या जागांवरील निवडणूक स्थगित झाली आहे.

## १३ डिसेंबरच्या सुनावणीकडे लक्ष

वटहुकुमाला स्थगिती दिली गेली तर ओबीसींचे आरक्षण जाईल, अशी भीती सरकारने व्यक्त केली. मात्र, ही समस्या तुम्हीच निर्माण केली असून तुम्हालाच त्याचे परिणाम भोगावे लागतील, या शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने फटकारले.यासंदर्भात पुन्हा १३ डिसेंबरला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार असून यावेळी पुर्ण निवडणूकच रद्द करण्याबाबत अनेक याचिका दाखल होण्याची चर्चा सुरु झाली आहे.ओबीसींचे आरक्षण नाही तर इतर जागेवरील निवडणुकीत मतदान करणार नाही अशी भूमिका उमेदवार व मतदारात निर्माण झाल्याने वाद पेटण्याची शक्यता आहे.सर्वच राजकीय पक्ष ओबीसीना वापरुन घेत असल्याचा सुर निर्माण होऊ लागला आहे.सोबतच न्यायालयाच्या बाबतीतही ओबीसीमध्ये आक्रोश दिसून येत आहे.

## जिल्हा परिषदेचे क्षेत्र वाढणार

गोंदिया जिल्हा परिषदेच्या सध्याच्या ५३ गटांमध्ये नव्याने ६ गटांचा तर पंचायत समितीच्या १०६ गणांमध्ये १२ गणांची वाढ राज्य सरकारच्या नव्या निर्णयामुळे होणार आहे. मात्र या निर्णयाला विधानसभेत अद्याप मंजूरी न मिळाल्याने पुढच्या निवडणुकीत ही वाढ लागू होण्याची शक्यता आहे. सध्याची निवडणूक मात्र जुन्या गट व गणांच्या संख्येनुसार होणार आहे. यात सर्वाधिक गट गोंदिया तालुक्यात ३ ने वाढण्याची शक्यता आहे.त्यानंतर लोकसंख्येच्यानुसार तिरोडा, गोरेगाव, अर्जुनी-मोरगाव या तालुक्यात जि.प.गटाची वाढ होण्यची शक्यता आहे.


**गोंदिया :** सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने ओबीसी प्रवर्गातील जागांच्या निवडणुका स्थगित केल्याने राज्यातील ओबीसी नेत्यामध्येंच नव्हे तर जनतेतही आक्रोश दिसून येत आहे.सर्वच राजकीय पक्ष ही आपली राजकीय पोळी शेकण्याचे काम करुन ओबीसींचे नुकसान करीत असल्याचा सुर चर्चामधून ऐकावयास मिळू लागला आहे.आमच्या जागेवर निवडणूका नाही,तर आम्हा ओबीसींचेही कुणाला मतदान नाही अशा भूमिका समोर येऊ लागल्याने सरकारसमोर आत्ता या निवडणुका पुर्णच रद्द करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.त्यातच सर्वोच्च न्यायालयाने १३ डिसेंबरला पुन्हा या प्रकरणात सुनवाणी ठेवली असून या सुनावणीच्यावेळी ओबीसी आरक्षण रद्द झालेले उमेदवार आपल्या वकिलांच्या माध्यमातून आपले म्हणने सादर करण्याची तयारी करीत असल्याची माहिती समोर आली आहे.

भंडारा गोंदिया जिल्हा परिषदेच्या १०५ जागापैकी २३ जागा,भंडारा व गोंदियातील १५ पंचायत समित्यामधील २१० जागापैकी ४५,राज्यातील १०६ नगरपंचायतीमधील १८०२ जागापैकी ३४४, महानगरपालिका पोटनिवडणुकीतील ४ पैकी १ ओबीसी जागेसह ५ हजार ४५४ ग्रामपंचायतींपैकी ७,१३० जागांसाठी निवडणूक होणार आहे,मात्र यातील ओबीसी प्रवर्गातील राखीव जागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे.एकीककडे या सर्वच निवडणुकात ओबीसींच्या जागा रद्द झाल्याने ओबीसी समाजाला अधिकृत असे प्रतिनिधीत्व लोकशाहीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत मिळणार नाही.त्यामुळे जर आम्हाला ओबीसी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेत जाता येत नसेल तर मतदान करुन तरी काय अर्थ अशा प्रतिक्रिया गोंदिया-भंडारा जिल्हा परिषदेच्या रद्द झालेल्या ओबीसी प्रभागातील उमेदवारांसह मतदार देऊ लागल्याने या निवडणुकीवर ओबीसींचा आक्रोश दिसून येण्याची शक्यता आहे.

## नगरपंचायत सहा जागांना निवडणूक स्थगिती

जिल्ह्यातील देवरी, सडक अर्जुनी आणि अर्जुनी मोरगाव नगरपंचायतीच्या ५१ जागांसाठी २१ डिसेंबरला निवडणूक होणार होती; मात्र आता ओबीसी प्रवर्गाच्या जागा वगळून निवडणूक होणार असल्याने नगरपंचायत एकूण ४५ जागांसाठीच निवडणूक होईल. यात सडक अर्जुनी नगरपंचायतच्या ३, अर्जुनी मोरगाव १ आणि देवरी नगरपंचायतच्या २ अशा एकूण सहा जागांची निवडणूक होणार नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इतर मागासवर्गीयांना (ओबीसी) आरक्षण पुन्हा बहाल करण्यासाठी राज्य सरकारने काढलेल्या वटहुकुमाला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अंतरिम स्थगिती दिल्यामुळे ओबीसी आरक्षण रद्द झाले. त्यामुळे १०५ नगरपंचायती, भंडारा, गोंदिया जिल्हा परिषद आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या १५ पंचायत समित्यांच्या आगामी निवडणुका आणि ४




महापालिकांतील पोटनिवडणुकांत ओबीसी आरक्षित जागांची निवडणूक होणार नाही. अन्य जागांसाठीची निवडणूक मात्र पूर्वघोषित कार्यक्रमानुसार होणार असल्याची घोषणा निवडणूक आयोगाने केली.

राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षणाचा निर्णय घेऊन तसा वटहुकूम काढला होता. त्यास आव्हान देणारी याचिका किसनराव गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर आदेश दिला. इम्पिरिकल डाटा तयार करण्याची साधी सुरुवातही गेल्या नऊ महिन्यात राज्य सरकारने केलेली नाही. ओबीसी आरक्षण टिकावे यासाठी वटहुकूम काढणाऱ्या राज्य सरकारला या आदेशाने मोठा धक्का बसला आहे. ४ मार्च २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थामधील ओबीसी आरक्षण रद्द केले होते. ओबीसींना आरक्षण देऊच नये असे सर्वोच्च न्यायालयाने कुठेही म्हटलेले नव्हते. मात्र, अनुसूचित जाती, जमातींना लोकसंख्येच्या अनुपातात आरक्षण देऊन उर्वरित आरक्षण ओबीसींना ५० टक्क्यांच्या मर्यादेत द्यावे आणि त्यासाठी हा डाटा तयार करावा असे स्पष्ट आदेशही दिले होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहूनच राज्य सरकारने ओबीसींना आरक्षण देणारा वटहुकूम काढला होता.त्या वटहुकूमाच्या विरोधात राहुल वाघ यांनी औरंगाबाद खंडपीठात याचीका दाखल केली होती.त्या याचिकेला अनुसंघून कोणत्याही प्रकारचा इम्पिरिकल डाटा नसल्याने निवडणूक आयोगासमोर ओबीसींना आरक्षण देण्याचा पर्याय खुला नाही, असे न्यायालयाने स्पष्ट करीत अध्यादेश रद्द करीत ओबीसींच्या जागाच रद्द केल्या. वॉर्डनिहाय ओबीसींचा डेटा मिळत नाही तोपर्यंत निवडणुका घेता येणार नाहीत, असं निरीक्षणही न्यायालयानं नोंदवलं आहे. न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर आणि न्यायमूर्ती सी. टी. रवीकुमार यांच्या खंडपीठानं राज्य सरकारच्या अध्यादेशाला आव्हान देणाऱ्या रिट याचिकेवर हा आदेश दिला आहे. राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीलाच नव्हे तर या अध्यादेशाविरुध्द याचिका टाकणारा भाजपचा कार्यकर्ता निघाल्याने आत्ता ओबीसीमध्ये सर्वच राजकीय पक्षाबद्दल आक्रोश दिसून येत आहे.

## जि.प.च्या या जागांवरील निवडणूक स्थगित

ओबीसी प्रवर्गाच्या जागा वगळून जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपंचायतीच्या निवडणुका घेण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या ठाणेगाव, निंबा, माहुरकुडा, महागाव, किकरीपार, घाटटेमनी, कोसमतोंडी, बोंडगावदेवी, इटखेडा, केशोरी या जागावरील निवडणुकीला स्थगिती दिल्याने निवडणूक होणार नाही.

## पचायत समितीच्या या २० जागांचा समावेश

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार ओबीसी प्रवर्गाच्या जागा वगळून निवडणूक घेण्यात येणार आहे. पंचायत समितीच्या ज्या जागांवर निवडणूक होणार नाही त्यात सडक अर्जुनी तालुक्यातील कोसमतोंडी व कोकणा, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील माहुरकुडा, नवेगावबांध, सालेकसा तालुक्यातील कारुटोला, तिरोडा तालुक्यातील सेजगाव, चिरेखणी, चिखली, गोंदिया तालुक्यातील घिवारी, सावरी, रतनारा, डोंगरगाव, पिंडकेपार, कुडवा, खमारी आणि गोरेगाव तालुक्यातील गणखैरा, हिरडामाली, मुंडीपार व आमगाव तालुक्यातील कट्टीपार व अंजोरा या पंचायत समिती क्षेत्राचा समावेश आहे

## आरक्षणाची गरज असल्यास ते द्यावेच-प्रवीण तोगडीया



**गोंदियाः-** जात ही भारताची वास्तविकता असून त्याला घबरण्याचे कारण नाही.जात ही नेहमी झगडे लावत नाही तर ती रक्षणाचे सुध्दा कामकरत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी ओबीसींच्या जनगणना व आरक्षणा बाबत बोलताना शिक्षण, आरोग्य आणि रोजगारासाठी आरक्षणासह अजून इतर ज्या काही गोष्टी करण्याची गरज पडली तर ते सरकारने करावे असे मत व्यक्त करीत ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेबाबत जात ही तेवढीच महत्वाचीच असे स्पष्ट केले आहे.'अयोध्येत साकारत असलेले राम मंदिर स्वागतार्ह आहे. परंतु, रामाच्या नावावर सत्तेत आलेले आज रामराज्य विसरले आहे,' अशी टीका आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रवीण तोगडीया यांनी सोमवारी केंद्र सरकारवर केली. यावेळी नगरपरिषदेचे उपाध्यक्ष शिव शर्मा उपस्थित होते.

येथील एका खासगी कार्यक्रमाकरीता गोंदियात आले असता प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. याप्रसंगी केंद्र सरकार वा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव न घेता ते म्हणाले, "भारताला अमेरिका बनविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आम्हाला भारतात रामराज्य हवे आहे. आर्थिक विकासाच्या नावाखाली हिंदुंचा बळी दिला जात आहे. मुठभर भांडवलशहांच्या हातात संपत्ती एकवटल्या गेली आहे. बेरोजगारीचे प्रमाण आणि शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर सतत वाढत आहे.

सोबतच लोकशाही टिकवून ठेवायची असेल तर निवडणूक पध्दतीत वापरली जाणारी ईव्हीएम मशीन हद्दपार करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. अमेरीकासारख्या प्रगत देशाने आणि ईव्हीएम तयार करणाऱ्या जापान सारख्या देशानेही या यंत्राचा वापर आपल्या देशात केलेला नाही. मग आपण आपल्या देशात कशासाठी करतो असा प्रश्न करीत ईव्हीएम मशीन हटविण्यासाठी सरकार रक्तरंजीत क्रांतीची वाट बघतेय का असा प्रश्न सुध्दा उपस्थित केला. मथुरा प्रकरणात सत्तेत असणाऱ्यानी काम करावे त्यासाठी केंद्राने कायदा करुन काशी मथुरा प्रकरणात न्याय द्यावे,असे म्हणतच हिंदू मुस्लीमांचे डीएनए एकच असल्याचे सरसंघचालक म्हणतात.त्यामुळे लवजेहादबाबत काय बोलावे असे प्रविण तोगडिया म्हणाले.

युपीत पुढे होऊ घातलेल्या निवडणुकीत जो निवडून येईल तोच २०२४ चा प्रधानमंत्रीपदासाठीचा महत्वाचा व्यक्ती राहणार असल्याचेही ते म्हणाले.सभामध्ये गर्दी लाखोची दिसते असे सांगत बिहार निवडणुकीत तेजस्वीच्या सभेत लाखोची गर्दी होती,मात्र निवडणुक निकालानंतर आपण सर्वच बघितले चमत्कार काय झाले, तशीच अवस्था युपीत राहणार यात शंका नाही. जरी अखिलेश यादवांच्या सभेला गर्दी लाखोंची असली तरी ईव्हीएम आमच्या हातात असल्याने सत्ता कुणाकडे राहील हे सागांयची गरज सुज्ञांना नसल्याचे तोगडिया म्हणाले.

## रिक्त पदामूळे समाजकल्याण विभाग बनले दिव्यांग

**गोंदिया:** सामाजिक न्याय विभागातरर्गत येत असलेल्या जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागासह सहाय्यक समाजकल्याण आयुक्त कार्यालयामध्ये गेल्या अनेक वर्षापासून रिक्त पदे असल्याने सामाजिक न्यायाच्या योजनांचा न्याय मिळण्यास अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.जिल्हा परिषदेंतर्गत समाजकल्याण विभागा विविध प्रकारच्या ३६ योजनांची अमलबजावणी करते.मात्र त्या ३६ योजनांची तालुकापातळीपर्यंत अमलबजावणी करण्यासाठी हवे असलेले समाजकल्याण निरिक्षकच या विभागाला गेल्या दोन तीन वर्षापासून उपलब्ध करुन दिलेले नाहीत.गोंदिया जिल्हा परिषदेच्या मंजुर १६ पदापैकी ११ पदे आजच्या घडीला रिक्त आहेत.त्यामध्ये कार्यालयीन अधिक्षक १, सहाय्यक लेखा अधिकारी १,



समाज कल्याण निरीक्षक ४, वरीष्ठ लिपीक २,वाहन चालक १,शिपाई २ या पदांचा समावेश आहे. या रिक्तपदामूळे कार्यालयीन कामकाज सांभाळत नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या योजनांची अमलबंजावणी विहित वेळेत पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.जेव्हा की या विभागामार्फेत ३६ योजना जिह्यात राबवण्यातय येत आहेत.

समाज कल्याण निरीक्षकाचे एकुण ५ पैकी एकच पद कार्यरत असल्यामुळे संपूर्ण योजनेचा कार्यभार त्यांचाकडे सोपविण्यात आलेला आहे. तसेच कनिष्ठ लिपीक यांचेकडे आवक जावक, आस्थापना शाखा, लेखा शाखा, अनुदानित वसतिगृह इत्यादी अत्यंत महत्वाची कामे सोपविल्यामुळे कामाचा अतिरिक्त ताण वाढलेला आहे. समाज कल्याण विभाग हा अत्यंत महत्वाचा सामाजिक घटक असतानाही गेल्या अनेक वर्षापासून रिक्तपदे भरण्यासाठी पाहिजे तसे प्रयत्न जिल्हा परिषदेकडून झाल्यानेच दिसून येत नाही.त्यामुळे या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा पुर्णतः बोजवारा उडाला आहे.

**राबविण्यात येणाऱ्या योजना**

दिव्यांग विभाग,जिल्हा निधी ५ टक्के,व्यसनमुक्ती, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे, आयटीआय शिष्यवृत्ती, ओबीसी शिष्यवृत्ती, वृद्धाश्रम, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती (५ ते ७ व ८ ते १०), अस्वच्छ व्यवसाय शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी, आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर योजना, २० टक्के सेसफंड,वृद्ध व साहित्यीक कलाकार मानधन, गुणवत्ता शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती (ओबीसी) ५ वी ते ७ वी आदी योजनांचा समावेश आहे.

## केंद्राने आणि राज्याने मिळून मार्ग काढवा : आमदार विनोद अग्रवाल



**गोंदिया :** मागील २ वर्षांपासून ओबीसी आरक्षणावर फक्त चर्चा सुरु आहे. केंद्र आणि राज्य सरकार एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहे सोबत पक्षांचे नेते सुद्धा एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. ओबीसींना आरक्षण मिळावे यासाठी प्रत्यक्षात कृती दोन्ही पक्षांतर्फे झाली नाही. जर कृती केली असती तर आज ओबीसी वर्गाला मिळालेले राजकीय आरक्षण रद्द झाले नसते. आणि निवडणूक रद्द करण्याची वेळ आली नसती.

राज्य सरकार ने इम्पेरिकल डेटा गोळा केला नाही. डेटा उपलब्ध व्हावा यासाठी केंद्रा सोबतच राज्य सरकारने देखील प्रयत्न केले नाही सोबतच सत्तेत असलेल्या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सुद्धा प्रयत्न केले नाही फक्त आरोप प्रत्यारोप केले. आरक्षण मिळण्यासाठी प्रत्यक्षात करावयाची कृती दोन्ही पक्षांतर्फे झाली नाही आणि यामुळे सवोच्च न्यायालयाने ओबीसींना दिलेले राजकीय आरक्षण रद्द केले. आणि ओबीसींच्या निवडणूक लढण्यावर गदा आली. जो ओबीसी वर्गावर अन्याय आहे. म्हणून आमदार विनोद अग्रवाल यांनी स्पष्ट मत मांडले आहे कि, जो पर्यंत ओबीसींना त्यांचा हक्क मिळत नाही त्यांना राजकीय आरक्षण मिळत नाही तो पर्यंत सर्वच निवडणुका शासनाने रद्द कराव्यात आणि ओबीसींना राजकीय आरक्षण देऊनच निवडणुकां घ्याव्यात.

आमदार विनोद अग्रवाल यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या राजकीय संघर्षामुळेच ओबीसी वर्ग स्थानिक स्वराज्य संस्थाची निवडणुक लढविण्यापासून वंचित राहिल्याची टीका केली आहे. केंद्राने आणि राज्याने फक्त ओबीसी वर्गाचे राजकारण करत एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले. मागून सुद्धा केंद्राने इम्पिरिकल डेटा राज्याला दिला नही आणि राज्याने सुद्धा इम्पिरिकल डेटा जमा केला नाही तसेच आयोगाचा रिपोर्ट यायच्या आतच लगीनघाई करत निवडणुका जाहीर करून टाकल्या. खरच केंद्र आणि राज्य सरकारला ओबीसी वर्गाला स्थानिक स्वराज्य संस्था मधे आरक्षण द्यायचे आहे तर एकत्र येऊन ओबीसी वर्गाचा ओबीसी आरक्षणाचा मार्ग मोकळा केला पाहिजे असे म्हटले आहे.

## विजेची थकबाकी पोहोचली ५४५ कोटींवर




**गोंदिया:** वीजबिल भरण्याच्या अनेक सुविधा उपलब्ध असतांनाही बहुतांश ग्राहकांनी ऑक्टोबर २०२० पासून वीजबिल भरलेले नाही. महावितरणच्या अस्तित्वासाठी ग्राहकांनी वापरलेल्या प्रत्येक युनिटची वसुली अत्यावश्यक असून सध्या महावितरण आर्थिक संकटात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे महावितरणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर विज बिल सक्तीने वसूल करण्याची नामुष्की ओढावली आहे. सध्यस्थितीत गोंदिया परिमंडळात घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, सरकारी कार्यालये, इतर लघुदाब, पाणीपुरवठा योजना, कृषिपंपधारक व पथदिवे या ग्राहकांकडे ऑक्टोबर २०२१ पर्यंत ५४५.९९ कोटींचे वीज बिल थकीत झाले आहे.परंतु अनेक ग्राहक वीजेसारख्या अतिआवश्यक सेवेचे पैसे भरण्याचे टाळून महावितरण व स्वत:साठी अडचणी निर्माण करीत आहेत. गोंदिया परिमंडळात गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील घरगुती ग्राहकांकडे १४ कोटी ३३ लाख, वाणिज्यिक ग्राहकांकडे २ कोटी २१ लाख, औद्योगिक ४ कोटी ५१ लाख, कृषि ग्राहकांकडे ४७९ कोटी ६७ लाख थकबाकी आहे. तर भंडारा मंडळात घरगुती ग्राहकांकडे ७ कोटी ६४ लाख, वाणिज्यिक ग्राहकांकडे १ कोटी ६ लाख, औद्योगिक २ कोटी ७ लाख, कृषी ग्राहकांकडे २५० कोटी ९३ लाख थकबाकी आहे.महावितरणच्या गोंदिया परिमंडळात थकबाकीदार ग्राहकांकडून वसुली, वीजपुरवठा खंडीत करण्याची कारवाई तसेच संशयास्पद असणाऱ्या तसेच ३० यूनिट पेक्षा कमी वापर असणाऱ्या ग्राहकांविरोधात मोहिम राबविण्यात येत आहे.

## जिप, पंस निवडणुकीसाठी १११४ अर्ज

गोंदिया जिल्हा परिषद व आठ पंचायत समिती निवडणुकीसाठी ६ डिसेंबरपर्यंत एकूण ११६४ अर्ज दाखल झाले आहे. अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारपर्यंत जिप गटासाठी ४२१ व पंस गणांसाठी ५२९ अर्ज प्राप्त झाले.

## नक्षल्यांनी जाळले रोडरोलर



**लांजी/गोंदिया :** मध्य प्रदेश राज्यातील बालाघाट जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या कारवाया वाढताना दिसून येत असतानाच शनिवारी (दि.४) पहाटे ४ वाजतादरम्यान मोठ्या संख्येत असलेल्या नक्षलवाद्यांनी मछुरडा व देवरबोली चौकाअंतर्गत रस्ता बांधकामावर असलेला रोडरोलर जाळला.माहितीनुसार, १० कोटी रुपयांच्या निधीतून देवरबोलीपासून मालकुंआ दरम्यान १२ किलोमीटर रस्त्याचे बांधकाम सुरू आहे. या कामाचे कंत्राट रायसिंग अँड कंपनीकडे असून ते काम करीत असून तेथे हा रोडरोलर सुरू होता. शनिवारी (दि.४) पहाटे ४ वाजतादरम्यान सुमारे ४० महिला नक्षलींसोबत असलेल्या सक्षस्त्र नक्षलवाद्यांनी तेथे धडक देत कॉम्रेड जीवा ऊर्फ मिलिंद तेलतुंबडे याच्या हत्येचा विरोध केला. तसेच, येत्या १० तारखेपासून मध्य प्रदेश-छत्तीसगढ व महाराष्ट्र राज्य बंद करण्याची मागणी करीत रोडरोलरला आग लावली.

या घटनेमुळे घाबरून मजूर कामावरून परतून गेले. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे ४ वाजता धडकलेले नक्षलवादी सकाळी ८ वाजतापर्यंत घटनास्थळीच होते. यादरम्यान त्यांनी लाल कापडी बॅनरमधून कॉम्रेड तेलतुंबडे याच्या हत्येचा निषेध केला. तसेच लाल बॅनर व पत्रकसुद्धा घटनास्थळी सोडले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी सर्चिंग ऑपरेशन अधिक वेगाने सुरू केले आहे.

विशेष म्हणजे, मागील २ वर्षांत नक्षलींना घेऊन मोठ्या प्रमाणात घटना घडल्या आहेत. यामध्ये १० जुलै २०२० रोजी लांजी क्षेत्रातील देवरबोली चौकीअंतर्गत पुजारीटोला येथे पोलीस चकमकीत पोलिसांनी मंगेश व नंदा या दोन नक्षलींना ठार केले. १७ नोव्हेंबर २०२० रोजी बालाघाट पोलिसांनी ८ रुपयांचा नक्षली बादल ऊर्फ कोसा याला जीवित पकडले होते. ६ नोव्हेंबर २०२० रोजी चकमकीत महिला नक्षली शारदा ऊर्फ पुज्जे हिला ठार केले. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी नक्षल्यांनी मालखेडी येथे पोलीस मुखबिर असल्याच्या संशयातून संतोष यादव व जगदीश पटले यांना घरून उचलून नेले व १३ नोव्हेंबर रोजी पहाटे ३ वाजता ठार केले होते.


२९ नोव्हेंबर रोजी सोनगुड्डा-चारघाट नाला मार्गावर नक्षली पत्रक मिळाले असून यापूर्वी किस नदी काठावरही नक्षल्यांनी टाकलेले पत्रक मिळून आले होते. तर आता ४ डिसेंबर रोजी नक्षल्यांनी रोडरोलर जाळल्याची घटना घडली आहे.

## नगरपंचायत निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी घोषित

**गोंदिया :** राज्य निवडणूक आयोगाचे २४ नोव्हेंबर २०२१ चे पत्रानुसार गोंदिया जिल्ह्यातील नगरपंचायत देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी येथील सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित झालेला आहे. त्यानुसार जिल्ह्यात २१ डिसेंबर रोजी होऊ घातलेल्या देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी नगरपंचायतीच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी घोषित करण्यात आले आहे.

सदर निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रत्येक नगरपंचायतीसाठी स्वतंत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. निवडणूकीची सर्व प्रक्रिया संबंधीत नगरपंचायतीचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून राबविण्यात येत असून निवडणूकीशी संबंधीत सर्व माहिती त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. सुलभ संपर्कासाठी खालीलप्रमाणे संपर्क कमांक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी नगरपंचायत निहाय पुढीलप्रमाणे. देवरी-अभिमन्यू बोधवड (९५९५११५१४८), सडक अर्जुनी- महादेव खेडकर (८२७५२००७२८), अर्जुनी-शिवराज पडोळे (७७९८३५०५३८) आहेत.




सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नगरपंचायत निहाय पुढीलप्रमाणे.देवरी- अजय पाटणकर (९७६५३३२९२८), सडक अर्जुनी- आशिष चौव्हान (९५९४९११३१४), अर्जुनी- शिल्पाराणी जाधव (७९७२३३७६५५) आहेत. असे जिल्हा प्रशासन अधिकारी करणकुमार चव्हाण यांनी कळविले आहे.

**नगरपंचायत निवडणूकीसाठी मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३ पर्यत**

**गोंदिया :** राज्य निवडणूक आयोगाने २४ नोव्हेंबर २०२१ चे पत्रानुसार घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार गोंदिया जिल्ह्यातील देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी या तीन नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका २१ डिसेंबर २०२१ रोजी घेण्यात येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाचे ३ डिसेंबर २०२१ चे पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार गोंदिया जिल्ह्यातील देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी या नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत राहील.असे जिल्हा प्रशासन अधिकारी करणकुमार चव्हाण यांनी कळविले आहे.

# पूर्वसूचनेशिवाय कँटीन टेंडर रद्द,कँटीनधारकांना रात्रीला काढले बाहेर



**गोंदिया:–** नवेगाव–नागझिरा व्याघ्रप्रकल्पातंर्गत वनविकास महामंडळाच्या जागेवर( FDCM) कँटीन चालवण्याचे कंत्राट शासकीय नियमानु–सारह गोरेगाव तालुक्यातील चिचगावटोला येथील मंगलदीप कृष्णकुमार भावे यांना मिळाले होते. २०१९ पासून ते निविदेनुसार कँटीन चालवत असून त्यांना परत ०१/१०/२०२१ पासून निविदेनुसार नागझिरा अभयारण्य उपहारगृह FDCM येथील कँटीन चालवण्याचे कंत्राट. तसे ते २०१९ पासून वेळोवेळी मिळालेल्या निविदेनुसार कँटीन चालवीत होते. मात्र फिर्यादीच्या तक्रारीनुसार ३०/११/२०२१ ला रात्री ११:३० वाजेच्या सुमारास वनपरिक्षेत्राधिकारी व्ही.एम. भोसले यांनी कँटीन मध्ये आ–पले कंत्राट रद्द झाले आहे असे सांगितले. आणि तिथे काम करणारे कामगार व फिर्यादीचे भाऊ यांना रात्रीच कँटीनच्या बाहेर काढले. फिर्यादीचा भाऊने विनंती करीत सकाळी कँटीनमधून बाहेर जाऊ रात्रीला राहू द्या, परंतु अधिकाऱ्याने उपसंचालक पूनम पाटे यांचा आदेश आहे असे सांगून बळजबरीने कारवाई करीत पंचनामा लिहून सह्या घेतल्या.

फिर्यादीचे म्हणणे की, त्यांनी दि ३०/११/२०२१ ला सायंकाळी ४ वाजता रिसॉर्ट मॅनेजर अमित लोखंडे यांचेकडे मासिक भाडे रक्कम ७१५०० रुपये जमा केले. गावला जात असताना (डी एम) नितीनकुमार सिंह यांचा फोन आला. त्यांनी कँटीन ची निविदा रद्द केल्याचे सांगितले. फिर्यादीला शासन निविदा मंजूर झाल्यावर कार्यारंभ आदेश मिळण्यासाठी १८ दिवस लागले आणि वन विभागाच्या परवानगी साठी ३ दिवस ला–गले. पण आता विनासुचना एका दिवसात अचानक कँटीन टेंडर कसे काय रद्द केले व नवीन कँटीनधारकास कोणतीही धा–वपळ न करता एका दिवसात वर्क ऑर्डर कसे काय मिळाले?. असा प्रश्न उपस्थित करुन नवीन कँटीन धारक व अधिकारी यांच्यात साटेलोटे असल्याचा आरोप करीत आपणास बेरोजगार करुन आपल्यावर आत्महत्या करण्याची वेळ आणल्याची तक्रार नागझिरा नवेगाव व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक आर.एम. रामानुजन यांच्याकडे केली आहे.

**कँटीनचालकाबद्दल पर्यटकांच्या तक्रारी–पूनम पाटे**

नागझिरा व्याघ्रप्रकल्पात वनविकास महामंडळाच्यावतीने चालविण्यात येत असलेल्या कँटीनबद्दल गेल्या काही महिन्यापासून सातत्याने पर्यटकांच्या तक्रारी येत होत्या.जेवणात गुणवत्ता नव्हती तसेच पर्यटक प्रवाश्यासोबंतचा व्यवहार योग्य नव्हता.त्यामुळे त्यांना सुचना देत सुधारणा करण्यास सांगितले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत व्यवहार सुरु ठेवले. त्यातच कँटीनरद्द करण्याच्या आदेशाच्या एकदोन दिवसामध्ये त्यांनी कँटीनमध्ये आत राहून सुध्दा पर्यटकांना जेवण उपलब्ध करुन दिले नाही अशा तक्रारी पर्यटकांच्या आल्या, त्याची चौकशी केल्यानंतर त्यांच्या कँटीनचा परवाना रद्द करण्यात आला. तसेच रात्रीलाच त्यांच्या कँटीनमधील कामगार जे थाडेझरीचे होते त्यांनी त्यांची गावी आणि कँटीनचालकाचा भाऊ व इतरांना शासकीय वाहनाने कोसमतोंडी येथे सोडण्यात आले. पर्यटकांना होत असलेला त्रास बघून कंत्राट रद्द करुन त्यांच्या निविदेनंतरची जी निविदा होती, त्या कंत्राटदारास कँटीनचे काम देण्यात आले असून भावे करीत असलेले आरोप बिनबुडाचे व तथ्यहीन असल्याचे बेरार टाईम्सला सांगितले.

# त्या पाच राईस मिलर्सवर भरडाईची मेहरबानी दाखविणारा तो अधिकारी कोण?




**गोंदिया:** रब्बी हंगामातील शिल्लक असलेला धान ३५ हजार क्विंटल सर्व पात्र असलेल्या राईस मिलर्सला समप्रमाणात वाटप करण्याचे निर्देश मुंबई येथे पार पडलेल्या बैठकीत देण्यात आले होते. मात्र चार पाच दिवसांपुर्वी जिल्ह्यात आलेल्या याच विभागाच्या अधिकाऱ्यांनी केवळ पाच राईस मिलर्सला हा धान भरडाईसाठी देण्याचे निर्देश जिल्हा मार्केटिंग फेडरेशन अधिकाऱ्यांना दिले. या संपूर्ण प्रकारात लाखो रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याची माहिती आहे. त्यामुळे मेहरबाणी दाखविणारा तो अधिकारी कोण याची चर्चा आहे.

राईस मिलर्सच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मुंबई येथे अन्न पुरवठा विभाग व मार्केटिंग फेडरेशनचे वरिष्ठ अधिकारी आणि राईस मिलर्स यांची बैठक पार पडली. या बैठकीत रब्बी हंगामातील शिल्लक असलेला ३५ हजार क्विंटल धान भरडाईसाठी सर्व राईस मिलर्सला समप्रमाणात वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जवळपास या धानाचे चारशे लाट होते. मात्र यानंतर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या याच विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने शिल्लक असलेला धान केवळ पाच राईस मिलर्सला भरडाईसाठी देण्याचे निर्देश जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्याला दिले. त्यामुळे या पाच राईस मिलर्सला भरडाईसाठी डिओ देण्यात आल्याची माहिती आहे. प्रती लाट २० हजार रुपये या प्रमाणे ४०० लाटचे डिओ दिल्याची चर्चा आहे. त्यामुळे या सर्व प्रकारामुळे इतर राईस मिलर्समध्ये खदखद आहे. त्यांनी याची तक्रार अन्न व नागरी पुरवठा मंत्री, मार्केटिंग फेडरेशनचे महाव्यवस्थापक, जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यामुळे या प्रकरणी आता नेकमी काय कारवाई होते याकडे लक्ष लागले आहे.

# हेल्मेट नसल्यास लायसन्स होणार रद्द

**गोंदिया:** वाढत्या अपघातांवर आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने सुधारित मोटार वाहन कायदा लागू केला आहे. राज्य शासनाने तब्बल २६ महिन्यानंतर राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता विना लायसन्स किंवा हेल्मेट न लावता प्रवास केल्यास दंड केला जाईल. हेल्मेट नसल्यास परवाना रद्द होणार असून विना परवाना वाहन चालविणाऱ्यांना पाच हजाराचा दंड ठोठावला जाणार आहे.




# बिबट्याच्या कातडीसह १० आरोपी अटकेत नागपूर व गोंदिया वनविभागाची संयुक्त कारवाई

**नागपूर:** मागील काही महिन्यांपासून वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी करणाऱ्यांवर वनविभागाकडून युद्धपातळीवर कारवाई होत आहे. आत्तापर्यत अनेक आरोपींना वनकोठडीत डांबण्यात आले. अशीच एक कारवाई नागपूर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी गोंदिया वनविभागाच्या कर्मचाऱ्यांसोबत आज रविवारी मिळून केली. यात बिबट्याच्या कातडीसह १० आरोपींना अटक करण्यात आली.



नागपूर वनविभागातंर्गत मागील काही महिन्यांपासून वाघाच्या व इतर वन्यप्राण्यांच्या अवयवांच्या तस्करीत अनेक आरोपींना अटक केली. त्यातूनच सदर माहिती वनविभागाला प्राप्त झाली. त्यानूसार विशेष पथक तयार करून गोंदिया येथील वनविभागाच्या मदतीने योग्य नियोजन करण्यात आले. सालेकसा कनिष्ठ महाविद्यालयाच्या मैदानावर बिबट कातडीची विक्री होत असल्याची माहिती वनकर्मचाऱ्यांना मिळताच १० आरोपींना सापळा रचून अटक करण्यात आली. राधेश्याम उईके (रा.जल्लाटोला), जोगेश्वर दसेरीया (रा.धनसोवा बोरी), पप्पू मडावी (जांभळी), दिनेश श्रीवास्तव (रा.भंडारा), संदीप रामटेके (मोकारा), दिनेश सहारे (देवरी), विनोद दशरीया (कावराबांध), लितेश वैंभुरे (बाघनदी, छत्तीसगड), पर–सराम मेश्राम (रा.गिरोला) व रामकृष्ण डहाले (रा.पांढरी) अशी आरोपींची नावे आहेत.

आरोपीकंडून बिबटाचे कातडी, ४ पंजे, दात, मिश्या व ३ मोटर सायकल यात जप्त करण्यात आल्या. सदर बिबट कोसमतर्राच्या जंगलात जुलै २०२१ मध्ये शिकार करून त्यांचे अवयव काढण्यात आले होते. त्यानंतर विक्रीसाठी बाहेर काढल्याची माहिती आरोपींनी चौकशीदरम्यान दिली. सदर कारवाई मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नागपूर वनवृत्त पी.कल्याणकुमार, उपवनसंरक्षक डॉ. भारतसिंह हाडा, गोंदियाचे उपवनसंरक्षक कुलराज सिंह, विभागीय वनाधिकारी पी.जी.कोडापे यांच्या मार्गदर्शनात सहा. वनसंरक्षक एन.जी. चांदेवार, संदीप गिरी, प्रदीप पाटील, एल.व्ही. ठोकळ, रविकमल भगत आदींनी केली. पुढील तपास सहा. वनसंक्षक प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

# अशोक शिक्षण संस्थेत शिक्षक भरती घोटाळा मुख्यध्यापकाची पोलिसांत तक्रार

**गोंदिया:–** नोकर भरती बंद असतानाही शाळा मुख्याध्यापकाच्या खोट्या स्वाक्षरीने प्रस्ताव सादर करुन दोन शिक्षकांची अवैध नियुक्ती केल्याप्रकरणी मुख्याध्यापकाच्या तक्रारीवरुन शिक्षण संस्था सचिव तसेच नियुक्त करण्यात आलेल्या दोन शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात श्रीनगर येथील अशोक शिक्षण संस्थेच्या सचिवांनी डिसेंबर २०१६ मध्ये शिक्षक पदासाठी फिर्यादी संत कबीर हायस्कूल सिवनीचे मुख्याध्यापक रमेशलाल हिरदोमल तनवानी( वय ५६) याना न विचारता एका वृत्तपत्रात जाहिरात देत आरोपी क्रमांक २ व ३ यांना शिक्षक पदावर नियुक्त केले. त्या शिक्षकांच्या नियुक्तीकरीता नियुक्ती मान्यता प्रस्ताव, शालार्थ आयडी प्रस्ताव यासाठी लागणार्या अन्य कागदपत्रावर मुख्याध्यापक तनवानी यांच्या खोट्या स्वाक्षरी करुन शिक्षणाधिकाऱ्यांना (माध्यमिक) सादर केले. आरोपी क्रमांक २ व ३ यांना संत कबीर हायस्कूलमध्ये ९ एप्रिल २०२० रोजी शिक्षक म्हणून नियुक्ती आदेश देण्यात आले व ऑगस्ट २०२० मध्ये शालार्थ आयडी प्राप्त करुन तनवानी यांची फसवणूक केली. डिसेंबर २०१६ ते ऑगस्ट २०२० दरम्यान घडलेल्या या प्रकरणात मुख्याध्यापक तनवानी यांच्या तक्रारीवरुन शहर पोलिसांनी भांदवी कलम ४२०,४६५,४६८,४६९,४७१,३४ अंतर्गत गुन्ह्यांची नोंद केली आहे. याप्रकरणात रावणवाडी पोलीस ठाण्यात यापुर्वी तक्रार दाखल झा–लेली होती.

जिल्ह्यातील सदर बोगस शिक्षक भरती प्रकरणात अनेक पोलीस ठाण्यात याप्रकरणात तक्रार दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी एकोडी व सिवनी येथीलच तक्रारीवर पोलीस विभागाने कारवाई केली असून इतर तक्रारीवर अद्यापह पोलिसांनी कुठलीच कारवाई केल्याचे दिसून येत नाही. त्याच बोगस भरती प्रकरणात शिक्षण उपसंचालकांनी शिक्षकांना निलबिंत केल्याचे पत्र दिले असले तरी त्या पत्राला फारसे महत्व शाळा व संस्थापकांनी दिल्याचेही दिसून येत नाही.त्यामुळे या प्रकरणाचा छडा लावणारे शिक्षक आमदार नागो गाणार यांच्यासाठी हा महत्वाचा प्रश्न ठरला आहे.

# प्रदेश सदस्याच्या त्रासाला कंटाळून भाजप नेत्यांचा राजीनामा

**गोंदिया:** गोंदिया जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पंचायतीच्या निवडणूका सध्या होवू घातलेल्या आहेत. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्यावतीने खुल्या जागांवरही ओबीसींना व स्थानिकांना संधी देण्यात येईल अशी घोषणा प्रदेश नेतृत्वांनी केली होती. मात्र अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदार संघात सर्वसाधारण व ओबीसी मतदार संघात सुद्धा निष्ठावंतांना डावलण्याचे काम करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील प्रदेश कार्यकारिणीच्या सदस्यांच्या मनमानी कारभारामुळे व त्रासामुळे भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यसत्वाचा राजीनामा जिल्हाध्यक्ष व संगठन मंत्र्याकडे सोपविला आहे.

यामध्ये जिल्हा बँकेचे संचालक केवळराम पुस्तोडे, व्यापारी संघटनेचे नवलकिशोर चांडक, किसान आघाडीचे सतिश कोसरकर, व भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष हेमराज पुस्तोडे यांच्यासह अनेकांचा समावेश आहे.

# आमदारांनी कापले माजी सभापतींचे तिकीट

**सालेकसा:** कारूटोला जिल्हा परिषद, मतदार संघाच्या माजी सदस्य तथा जि.प. सभापती लता दोनोडे यांचे काँग्रेसमधून तिकीट पक्के समजण्यात येत होते. मात्र ऐनवेळी त्यांचे तिकीट कापून वंदना काळे यांना देण्यात आले. त्यामुळे लता दोनोडे समर्थकांमध्ये नाराजी असून आमदार कोरोटे विरोधात रोष व्यक्त करण्यात येत आहे. तिकीट बलल्यामुळे काँग्रेसची वाट बिकट असून समीकरण बिघडण्याचे चिन्ह आहे.

जसजसी मतदानाची तारीख जवळ येत आहे. तसतशी निवडणुकीची रंगत वाढू लागली आहे. या पक्षातून त्या पक्षात अशी अवस्था झाली आहे.राजकीय पक्षांची तिकीट जाहिर केले आहे. यात ज्यांना वगळण्यात आले, त्या उमेदवारांचा हिरमोळ झाल्याने नार–ाजीचा सुर आहे. कारूटोला जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक नेहमीच प्रतिष्ठेची राहिली आहे. गतवेळी या जागेवरुन लता दोनोडे यांनी काँग्रेस पक्षातून निवडणूक लढविली. त्यांनी निवडणूक जिंकली देखील जिल्हा परिषदेचे सभापतीपद देखील त्यांना देण्यात आले. त्यामुळे त्यांनी संधीचे सोने करत या मतदारसंघात पक्षबांधणीवर भर दिला. त्यामुळे या क्षेत्रात पक्षाची बाजू भक्कम झाली. लता दोनोडे यांना पुन्हा या मतदारसंघातून संधी देण्यात यावी, अशी मागणी त्यांच्या समर्थकांनी केली होती. त्यांचे तिकीट पक्के समजण्यात येत होते. अशात ऐनवेळी त्यांचे तिकीट कापून वंदना काळे यांना काँग्रेसने उमेदवारी दिली आहे. त्यावरुन लता दोनोडे समर्थकांमध्ये आमदाराविरोधात कमालीची नाराजी पसरली असून आरोप–प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या मतदार संघात भाजपाची बाजू भक्कम होतांना दिसत आहे.

# ८.६५० किलोग्रॅम गांजा जप्त



**गोंदिया:** शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात रामनगर पोलिसांनी सापळा रचून दोन युवकांकडून १ लाख ३ हजार ८०० रुपये किमतीचा ८ किलो ६५० ग्रॅम जप्त केला. ही कारवाई २ डिसेंबर रोजी रात्री करण्यात आली.

रामनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० ते ३५ वर्ष वयोगटातील दोन इसम गांजा घेऊन रेल्वेने घेऊन जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी रेल्वे परिसरात सापळा रचला. या परिसरातील गुजराती शाळेकडे जाणाऱ्या गल्ली दोन युवक संदिग्ध स्थितीत आढळल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळील बॅगची तपासणी केली असता १,०३, ८०० रुपये किमतीचा ८ किलो ६५० ग्रॅम आढळून आला. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करुन गांजा जप्त केला.

अंतरयामी बिरची महानंदिया (३५) व नरी बिदेशी महानंदिया (३२) रा. कुमारसिंगा, ओडिसा अशी आरोपींची नावे आहे. आरोपींवर रामनगर पोलिस ठाण्यात कलम २, २०, २९ एनडीपीसी कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने त्यांना ८ डिसेंबरपर्यत पोलिस कोठडी ठोठावली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरिक्षक बबन आव्हाड, देवीदास कठाडे, पोउपनि तेजेंद्र मेश्राम, जीवन पाटील, मनोज उघडे, यादव, महेश विघ्ने, पोहवा. राजेंद्र मिश्रा आर्दीनी केली.

# क्रिमीलेअर उत्पन्न मर्यादेत वाढ नाही

**गोंदिया:** ओबीसी समाजातील युवकांना क्रिमीलेअरच्या अटीमुळे शिक्षण आणि नोकरी मिळवण्यात अडचणी निर्माण होत असून क्रिमीलेअरची उत्पन्नाची मर्यादा तीन वर्षांहून अधिक कालावधी झाला तरी वाढण्यात आलेली नाही.

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय खात्याला ओबीसी आर–क्षणामध्ये क्रिमीलेअरसाठी उत्पन्नाची मर्यादा वाढवण्याचा निर्णय घ्यायचा आहे. साध–ारणतः दर तीन वर्षांनी उत्पन्न मर्यादा वाढवण्यात येते. १ सप्टेंबर २०१७ पासून ओबीसीसाठी क्रिमीलेअरसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये आहे.


२०१३ मध्ये क्रिमीलेअरसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा साडेचार लाखांवरून ६ लाख करण्यात आली होती, तर २०१७ मध्ये केंद्र सरकारने ही मर्यादा ६ लाखांवरुन ८ लाख केली. आता ती १२ लाख रुपये करण्याचे प्रस्तावित आहे. परंतु अद्याप ते लागू करण्यात आले नाही.




त्यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच नोकरीत देखील ओबीसी प्रवर्गातून संधी नाकारली जाते.

सध्या शेतीचे आणि नोकरीतून मिळणारे उत्पन्न क्रिमीलेअरसाठी गृहीत धरले जात नाही. ८ लाख रुपये वार्षिक उत्पन्न असलेले विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी मिळत नाही. तसेच उच्च शिक्षण नसल्याने ओबीसींच्या उच्चपदस्थ जागा रिक्त आहेत. त्यामुळे किमान २० लाख रुपये वार्षिक उत्पन्न क्रिमीलेअरसाठी गृहीत धरावे, अशी मागणी ओबीसी अधिकार मंच,राष्ट्रीय पिछडा ओबीसी संघटन,ओबीसी महासभा,ओबीसी जनमोर्चा,ओबीसी संघर्ष कृती समिती,ओबीसी सेवा संघाची आहे. तसेच केंद्र सरकार वार्षिक उत्पन्नात शेतीचे उत्पन्न आणि नोकरीतून मिळणारे उत्पन्न मोजण्याचा विचार करीत आहे. मात्र त्याला विरोध होत आहे.

मोदी सरकारने उत्पन्न मर्यादा वाढवण्याचा निर्णय राखून ठेवला आहे. त्याचा फटका ओबीसी विद्यार्थ्यांना बसत आहे.केंद्र सरकार जोपर्यंत क्रिमीलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवत नाही, तोपर्यंत राज्य सरकार अभिछात्रवृत्ती (फ्रीशिप) ची मर्यादा वाढवू शकत नाही. सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वेतन वाढले. तेव्हा तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच `देखील आठ लाखाच्या वर उत्पन्न झाले आहे. तर आठ लाख किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना अभिछात्रवृत्ती मिळते. त्यामुळे शेकडो ओबीसी विद्यार्थी अभिछात्रवृत्तीपासून वंचित राहतात. क्रिमीलेअरच्या उत्पन्न मर्यादामुळे केंद्र सरकारच्या विविध विभागातील ओबीसींचे रिक्त पदे आहे. केंद्राने पात्र ओबीसी उमेद–वार मिळत नसल्याचे सांगून २७ टक्के जागा भरलेल्या नाहीत, असे भारतीय पिछडा शोषित संघटनेचे उपाध्यक्ष प्रा.रमेश पिसे म्हणाले.



# विधानपरिषदेसाठी ही निवडणूक ठरणार महत्वाची

**गोंदिया:** ही निवडणूक जरी स्थानिक स्वराज्य संस्थांची असली तरी या निवडणुकीवर पुढील वर्षी होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीचे भविष्य अवलंबून आहे. या निवडणुकीतील विजयाचे समीकरण विधान परिषदेच्या उमेदवाराचे गणित ठरविणार आहे. त्यामुळे या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपसह सर्वच राजकीय पक्षांनी जोर लावल्याने चूरस वाढणार आहे.

भंडारा–गोंदिया विधान परिषदेसाठी पुढील वर्षी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदेचे सदस्य मतदान करतात. त्यामुळे या निवडणुकीत चांगलाच घोडेबाजार होते. ही निवडणूक म्हणजे जेवढे अधिक वजन ज्याचे असेल त्याच्या पारड्यात मत अशी असते.

विशेष म्हणजे पुढील वर्षी होणाऱ्या विधान परिषद निवडणुकीपूर्वी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर पंचायतची निवडणूक होत आहे. त्यामुळे विधान परिषदेच्या संभाव्य उमेदवार व राजकीय पक्षांनी या निवडणुकीत जोर लावला आहे. आपल्या पक्षाचे अधिकाधिक उमदवार कसे निवडून येतील, यासाठी मागील दोन महिन्यांपासून रणनिती आखली जात



आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल पटेल व भाजपचे विधानपरिषद सदस्य परिणय फुके यांनी प्रत्येक तालुक्यातच नव्हे तर जिल्हा परिषद गटातील गावात जाऊन बैठका घेत शक्तीप्रदर्शन केलेले आहे.

पक्षाचे वरिष्ठ नेते जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर पंचायत निवडणुका होऊ घातलेल्या क्षेत्रात तळ ठोकून बसले आहेत. या निवडणुकीत ज्या पक्षाचे उमेदवार सर्वाधिक निवडून येतील, त्याला विधान परिषदेची निवडणूक लढविणे तेवढेच सोपे जाणार आहे.

त्यामुळे नंतर घोडेबाजार करण्यापेक्षा आताच जेवढा जोर लावता येईल तेवढा लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. कारण याच निवडणुकीतील विजयाच्या समीकरणावरून विधान परिषदेच्या निवडणुकीचे गणित ठरणार आहे. त्यामुळे यावेळेच्या जिल्हा परिषद निवडणुकीत चांगलीच चूरस निर्माण होण्याची शक्यता आहे. अधिकाधिक उमेदवार निवडून यावे, यासाठी सर्वच पक्षांनी तगडे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविण्यासाठी चाचपणी करणे सुरू केले आहे. त्यामुळेच उमेदवारी जाहीर करण्यास विलंब होत आहे.

**आयात केलेला उमेदवार नकोचा सूर**

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर झाले आहे. काही मतदारसंघ आरक्षित झाल्याने अनेक इच्छुकांचा हिरमोड झाला. त्यामुळे त्यांनी आता दुसऱ्या मतदारसंघातून तयारी करणे सुरू केले आहे. पण, त्याच ठिकाणी त्याच पक्षाच्या उमेदवारांनी आधीपासून फिल्डिंग लावून ठेवली होती. तर, ऐनवेळी पक्षाकडून बाहेरील आयात केलेल्याला उमेदवारी देऊ म्हणून बाहेरचा उमेदवार नकोच, अन्यथा आम्ही वेगळी चूल मांडू, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांसमोरसुद्धा पेच निर्माण झाला आहे.

**महिला उमेदवारांचा शोध घेताना लागतोय कस**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव आहे. तर, काही ठिकाणी सोडतीदरम्यान सर्वसाधारण महिला असे निघाले, त्यामुळे महिला सदस्यांची संख्या जिल्हा परिषदेत वाढली आहे. पण, महिला उमेदवारांचा शोध घेताना सर्वच राजकीय पक्षांचा सध्या कस लागत आहे.

**बंडखोरीची शक्यता बळावली**

सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी अद्यापही उमेदवारांची यादी जाहीर केली नाही. एकाच जागेसाठी पक्षात इच्छुकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे त्यांची मनधरणी करण्यात यश आले नाही तर बंडखोरीच्या समस्येला तोंड द्यावे लागणार आहे. त्यामुळे अखेरच्या टप्प्यात याद्या जाहीर करण्याचे नियोजन केल्याचे बोलल्या जाते. उमेदवारीवरून अनेकांची भ्रमनिराशा होण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे सर्वच पक्षांत बंडखोरी झाल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

**असंतुष्टांना संतुष्ट करणार शिवसेना**

सर्वच पक्षात उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे सर्वांचेच समाधान करणे राजकीय पक्षांना सुद्धा शक्य होणार नाही. त्यामुळे शिवसेनेने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपामधील असंतुष्ट सदस्यांना उमेदवारी देऊन संतुष्ट करण्याची तयारी ठेवल्याची चर्चा आहे.

**प्रमुख क्षेत्रांकडे नजरा**

जिल्हा परिषद निवडणुकीत काही क्षेत्रांत काटे की टक्कर होण्याची शक्यता आहे. त्यात फुलचूर, नागरा, कामठा, अंजोरा, सोनी, एकोडी, सुकडी डाकराम, नवेगावबांध, अर्जुनी, वडेगाव, डव्वा, गोठणगाव या क्षेत्रांतील उमदवारी जाहीर झाल्यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे. या क्षेत्रांतून दिग्गज उमेदवार निवडणूक रिंगणात उतरणार आहेत. त्यामुळे सर्व जिल्हावासीयांच्या नजरा याकडे लागल्या आहे.

# भाजपमध्ये खिंडार, माजी सभापतींची काँग्रेसमध्ये एण्ट्री

**देवरी:** घराणेशाही राजकारणाला विरोध करण्यासाठी भाजपचे माजी सभापती सुनंदा बहेकार यांना पुराडा जिल्हा परिषद क्षेत्रातील नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी आपला हक्काचा उमेदवार म्हणून पसंती दाखविली. नागरिकांची पसंती आणि कार्यकर्त्यांचा उत्साह बघून सुनंदा बहेकार यांनी मंगळवार, ३० नोव्हेंबर रोजी आमदार सहेसराम कोरोटे यांच्या निवासस्थानी अखेर काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्यामुळे भारतीय जनता पक्षात खिंडार पडल्याचे दिसून आले आहे.

देवरीच्या राजकीय वर्तुळात प्रतिष्ठेचा क्षेत्र म्हणून ओळख असलेला पुराडा जिल्हा परिषद क्षेत्रात अनेक दिग्गजांनी आपले नशीब आजमावले. नवीन आरक्षण सोडत येण्यापूर्वी सर्वसाधारण आरक्षण असल्यामुळे अनुभवी राजकारणी व्यक्तींनी आपली कंबर कसली होती आणि मेहनतदेखील घेतली. नवीन आरक्षणानुसार पुराडा जिल्हा परिषद क्षेत्र महिला राखीव आरक्षणात आले. त्यामुळे माजी आमदार संजय पुराम आणि माजी सभापती सविता पुराम यांचे पुराडा हे गृहक्षेत्र असल्याने भाजपचा तिकीट पुन्हा सविता पुराम यांना मिळत असल्याने घराणेशाही राजकारणामुळे



नागरिक आणि कार्यकर्त्यांमध्ये उदासीनता निर्माण झाल्याचे बघावयास मिळाले. दरम्यान, नागरिक व कार्यकर्त्यांचा उत्साह बघून माजी सभापती सुनंदा बहेकार यांनी मंगळवारी आमदार सहेसराम कोरोटे यांच्या निवासस्थानी भेट घेऊन काँग्रेस पक्षात प्रवेश केले. आमदारांनी काँग्रेसचा दुपट्टा देऊन त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी संदीप भाटिया, अविनाश टेंभरे, किरण राऊत, सुनंदा बहेकार, कोमेंद्र मेंढे, प्रदीप परिहार, उर्मिला डोये, भेगराज पटले आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**निवडणुकीत चांगलीच रंगत येणार**

पुराडा जिल्हा परिषद क्षेत्र समस्यांचे माहेरघर आहे. रस्त्यापासून, पाणी टंचाई, आरोग्याच्या सोयी आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्यास जनप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांचा रोष बघावयास मिळत आहे. आश्वासनाशिवाय कुठलाही काम लोकप्रतिनिधींनी केलेला नाही. कंत्राटदार रस्त्याचे काम अर्ध्यावर सोडून पडतात. परंतु, निवडून दिलेले प्रतिनिधी समस्या गांभीर्याने घेत नसल्यामुळे या निवडणुकीत मतदार कुणाला कौल देतात? याकडे सर्वांचे लक्ष आहे. त्यामुळे या क्षेत्राच्या आगामी निवडणुकीत रणसंग्राममध्ये चांगलीच रंगत येणार आहे.

**पुराडा क्षेत्रात १२ ग्रामपंचायती**

पुराडा जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत १२ ग्रामपंचायती येतात. यात लोहारा, सुरतोली, ओवारा, सावली, डोंगरगाव, देवाटोला, हरदोली, ढिवरीटोला, शिलापूर, फुक्कीमेटा, पुराडा, मुरपार असे एकूण १२ ग्राम पंचायतींचा समावेश आहेत.

## प्रदेश महिला काँग्रेसच्या महासचिव पदाचा शिला पटले यांनी दिला राजीनामा

**गोंदिया:–** महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीच्या महासचिव शिला पटले यांनी आपल्या काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वासोबतच महासचिव पदाचा राजीनामा महिला प्रदेश अध्यक्ष संध्याताई सव्वालाखे यांच्याकडे सोपवला आहे.



राजीनामा पत्रात गेल्या ८ वर्षांपासून आपण काँग्रेस पक्षात कार्यरत राहून तनमनधनाने काम केले. मात्र पक्षात एक महिला व प्रदेश महासचिव म्हणून जो मान सन्मान मिळायला हवा होता. तो मिळाला नाही, त्यातच तालुका, जिल्हा पातळीवर सुध्दा सातत्याने डावलण्याचेच काम करण्यात आल्याने महिलांना योग्य न्याय मिळत नसल्याचे लक्षात आल्याने महासचिव पदाचा राजीनामा देत असल्याचे म्हटले आहे.

## काँग्रेसला झटका आशिष नागपूरेंनी घेतली हातात चाबी

**गोंदिया:** गोंदिया जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी फूलचूर जिल्हा परिषद गटाचे प्रबळ दावेदार असलेले आशिष गिरिजाशंकरसिंह नागपूरे यांनी अखेर काँग्रेसमधल्या एकाधिकारशाहीला आणि अवमानजनक भूमिकेला कंटाळून पक्षत्याग करीत जनता की पार्टी (चाबी संघटना) मध्ये प्रवेश केला.

काँग्रेसी असलेले नागपूरे हे मध्यंतरी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. त्यानंतर त्यांनी नाना पटोलेंच्या विचारामुळे काँग्रेसमध्ये परत आले. तेव्हा त्यांना फुलचूर जिल्हा परिषदेची जागा देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु यावेळी त्यांना उमेदवारी न देता इतर उमेदवाराला देण्यात आली. त्यामुळे आशिष नागपूरे यांनी काँग्रेस पक्षाला सोडून जनता की पार्टीच्यावतीने फूलचूर जिल्हा परिषद मतदारसंघात उमेदवारी अर्ज सादर केला आहे. नागपूरे यांचा पक्षात आमदार विनोद अग्रवाल यांच्यासह इतरांनी स्वागत केले.





## आदित्यची रायफल स्पर्धेत निवड

**गोंदिया:** भोपाळ येथे नुकत्याच पार पडलेल्या ६४ व्या नँशनल रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये मूळ चा गोंदिया येथील व सध्या नागपूर येथे प्रशिक्षण घेत असलेल्या आदित्य अनंत जगताप याने राष्ट्रीय रायफल शुटिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी या स्पर्धेत प्राविण्यासह यश संपादन केले आहे.पहिल्या ८ मध्ये आदित्यची निवड इंडिया ट्रायलमध्ये झाल्याने सर्वत्र अभिनंदन करण्यात आले आहे.

| जि.प.क्षेत्र | २०२१ प्रवर्ग | भाजप | काँग्रेस | राकाँ | चाबी |
|---|---|---|---|---|---|
| १)बिरसोला | सर्वसाधारण (महिला) | सौ.धनवंती मानकर | हिना प्रकाश देवाधारी | नेहा केतन तुरकर | शामला पाचे |
| २)पांजरा | अनुसुचित जमाती (महिला) | हेमलता चिचाम | सुषमा खांडवाये | | कु.वैशाली पंधरे |
| ३)काटी | अनुसृचित जमाती | विजेंद्र कोडापे | गोविंद गावड | | कु.अनंदा वाढीवा |
| ४)धापेवाडा | अनुसृचित जमाती | विजय उईके | नरेशकुमार टेकार | | घनश्याम सयाम |
| ५)पांढराबोडी | अनुसृचित जाती (महिला) | पंचफुला देशभ्रतार | बबीता गजभिये | | |
| ६)कामठा | अनुसृचित जमाती | रितेश मलगाम | रामकृष्ण पंधरे | | |
| ७)नागरा | सर्वसाधारण | भरत लिल्हारे | चमनलाल बिसेन | डॉ.विनोद पटले | टिटुलाल लिल्हारे |
| ८)रतनारा | सर्वसाधारण(महिला) | श्रीमती अटरे | भुमाबाई चौधरी | | |
| ९)एकोडी | सर्वसाधारण (महिला) | श्रीमती बघेले | सरिता अंबुले | सौ. पटले | नामदेवराव बिसेन |
| १०)पिंडकेपार | अनुसूचित जाती (महिला) | निशा गेडाम | प्रीया मेश्राम | | दीपा चंद्रीकापुरे |
| ११)कुडवा | अनुसृचित जमाती | नुरनाथ दिहारी | चंद्रप्रकाश येल्ले | पूजा अखिलेश सेठ | कमल फरदे |
| १२)आसोली | सर्वसााधारण(महिला) | लक्ष्मी तरोणे | शालू राजीव ठकरेले | | |
| १३)खमारी | अनुसूचित जमाती (महिला) | हेमलता नाईक | वनिता मडावी | | ममता वाढवे |
| १४)फुलचूर | सर्वसाधारण | संजय टेंभरे | निलम हलमारे | गंगाराम बावणकर | आशिष नागपूरे |
| १५)घाटटेमनी | नामाप्र (ओबीसी) | मीरा रमेश चुटे | तारेश्वरी गौतम | शिलाबाई बाम्हणकर | |
| १६)किकरीपार | नामाप्र (महिला) | भुमेश्वरी जैतवार | अरुणा बहेकार | रुपाली राजेश भक्तवर्ती | |
| १७)गोरठा | सर्वसाधारण | हरीहर मानकर | छबुताई उके | तुलेंद्र दिगंबर कटरे | विजय नागपूरे(सेना) |
| ८)ठाणा | अनुसृचित जमाती | हनुमंत वट्टी | यादोराव भोयर | जियालाल पंधरे | |
| १९)अंजोरा | सर्वसाधारण (महिला) | इंद्रायणी पटले | उषाताई मेंढे | गायत्री कटरे | |
| २०)झालीया | सर्वसाधारण (महिला) | | | देवका नागपुरे | |
| २१)पिपरिया | सर्वसाधारण (महिला) | | | दुर्गा तिराले | |
| २२)तिरखेडी | सर्वसाधारण | श्रीमती बिसेन | विमल कटरे | | |
| २३)कारुटोला | सर्वसाधारण (महिला) | टिना चुटे | वंदना काळे | | |
| २४)शहारवानी | सर्वसाधारण | मोरेश्वर कटरे | जितेन्द्र कटरे | डॉ.श्रीप्रकाश रहांगडाले | |
| २५)सोनी | सर्वसाधारण | पंकज रहांगडाले | पी.जी.कटरे | | |
| २६)घोटी | अनुसृचित जमाती (महिला) | | | | |
| २७)कुऱ्हाडी | अनुसृचित जाती | पंचभाई | | | |
| २८)मुंडीपार | सर्वसाधारण | डॉ.लक्ष्मण भगत | डुमेश चौरागडे | केवल बघेले | |
| २९)निंबा | नामाप्र (महिला) | | | | |
| ३०)अर्जुनी | सर्वसाधारण | चत्रभुर्ज बिसेन | जागेश्वर निमजे | कैलास पटले | |
| ३१)सेजगाव | सर्वसाधारण | पवन पटले | ओमप्रकाश पटले | राजलक्ष्मी तुरकर | |
| ३२)सुकडी डाकराम | सर्वसाधारण | मदन पटले | गजानन रेवतकर | जगदीश बावनथडे | |
| ३३)ठाणेगाव | नामाप्र (महिला) | माधुरी रहांगडाले | मंगला खोब्रागडे | सविता पटले | |
| ३४)कवलेवाडा | सर्वसाधारण | ब्रिजलाल रहांगडाले | ग्यानीराम डोंगरवार | किरणकुमार पारधी | |
| ३५)सरांडी | अनुसृचित जमाती (महिला) | रजनी कुंभरे | सुनिता वाळिवे | ज्योती मडावी | |
| ३६)वडेगाव | सर्वसाधारण (महिला) | तुमेश्वरी बघेले | लक्ष्मी पटले | निता रहांगडाले | |
| ३७)पांढरी | नामाप्र | विश्वनाथ रहागंडाले | दामोदर नेवारे | अविनाश काशिवार | |
| ३८)डव्वा | सर्वसाधारण | भुमेश्वर पटले | दिनेश हुकरे | गंगाधर परशुरामकर | |
| ३९)सौंदड | अनुसूचित जमाती (महिला) | रेखा जनबंधू | आशा पुसाम | | |
| ४०)चिखली | सर्वसाधारण (महिला) | कविता रंगारी | दोनोडे | | |
| ४१)शेंडा | सर्वसाधारण (महिला) | चंद्रकला डोंगरवार | किरण हटवार | | |
| ४२)पुराडा | सर्वसाधारण (महिला) | सविता पुराम | सुनंदा बहेकार | श्रीमती टप्पे | |
| ४३)गोटाबोडी | अनुसूचित जाती (महिला) | निलेश बांते | | | |
| ४४)भर्रेगाव | सर्वसाधारण | ादवराव पंचमवार | संदिप भाटिया | अर्चना ताराम | राजू चांदेवार(शिवसेना) |
| ४५)ककोडी | अनुसूचित जाती | दिलीप अबंरवाडे | उषा शहारे | चंद्रपाल शहारे | प्रमोद भैसारे(शिवसेना) |
| ४६)चिचगड | सर्वसाधारण (महिला) | निता कुंजाम | राधिका धरमगुडे | प्रगती कोल्हारे | रशिदा मंसुर बंदेअली (शिवसेना४ |
| ७)गोठणगाव | अनुसूचित जाती | राजहंस धोटे | | यशवंत गणवीर | |
| ४८)नवेगावबांध | सर्वसाधारण (महिला) | रचनाताई गहाणे | | नंदा लोकपाल गहाणे | |
| ४९)बोंडगावदेवी | नामाप्र | लायकराम भेंडारकर | | किशोर तरोणे | |
| ५०)माहुरकुडा | नामाप्र (महिला) | नंदा शिवणकर | | | |
| ५१)इडखेडा | नामाप्र | उमाकांत ढेंगे | | यशवंत परशुरामकर | |
| ५२)महागाव | नामाप्र (महिला) | जयश्री देशमुख | | सौ. देशमुख | |
| ५३) केशोरी | नामाप्र | प्रकाश गहाणे | श्रीकांत घाटबांधे | योगेश नाकाडे | |

# पहिल्यांदाच जिप निवडणुकीत चाबी संघटना

## गोंदिया विधानसभा क्षेत्रातील उमेदवार जाहीर : भाजपला जाणार जड

**गोंदिया:** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक तोंडावर आली आहे. निवडणूक आयोगाने अचानक निवडणूक जाहीर केल्याने राजकीय पक्षांची धांदल उडाली. असे असले तरी सर्वच पक्ष जीव तोडून कामाला लागले. गोंदिया विधानसभा मतदार संघात भाजपमधून बंडखोरी करत अपक्ष निवडणूक जिंकलेले विनोद अग्रवाल यांनी आपल्या जनता की पार्टीकडून उमेदवार लढविण्याचा चंग बांधला. त्याकरिता त्यांनी आठही जिल्हा परिषद आणि १६ पंचायत समिती गटांचे उमेदवार जाहीर केले.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पंचायती, ग्राम पंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. मतदानाची तारीख देखील जाहीर झाली. राजकीय पक्षांचा उमेदवार निवडीचा कार्यक्रम सुरू असून उमेदवार देखील जवळपास निश्चित झाले आहेत. केवळ काही जागांवरील उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने विनोद अग्रवाल यांना तिकीट नाकारत नव्यानेच पक्षात प्रवेश केलेले गोपाल अग्रवाल यांना तिकीट दिले. त्यामुळे विनोद अग्रवाल समर्थकांनी विनोद अग्रवाल यांनी बळ देत अपक्षा निवडणूक लढविण्याची मागणी लावून धरली. विनोद अग्रवाल निवडणूक लढले आणि जिंकले देखील. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक असल्याने विनोद अग्रवाल यांनी गोंदिया मतदारसंघावर आपले वर्चस्व कायम ठेवण्याकरिता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीकरिता उमेदवार देखील जाहीर केले. पंचायत समितीकरिता बिरसोला येथील रमेश नागफासे, पांजरा जितेंद्र कुंजाम, काटी जितेश्वरी रहांगडाले, दासगाव खुर्द मंजू डोंगरे, नवेगाव हिरामन डहाट, धापेवाडा मधुकर रहांगडाले, घिवारी राजू कटरे, गर्रा खुर्द वेणूबाई गावड, नागरा पुष्पा ढेकवार, डोंगरगाव विद्याकला पटले, पिंडकेपार शैलजा सोनवाने, कुडवा लिमेंद्र बिसेन, कटंगीकला संजू बडवाईक, खमारी कनिराम तावाडे, तुमखेडा खुर्द मुनेश रहांगडाले आणि कारंजा येथून मिताराम हरडे यांना उमेदवारी जाहीर केली. जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच एक वेगळी आघाडी मैदानात असल्याने गोंदिया विधानसभा मतदार संघात चुरस निर्माण होणार आहे.

## जिल्ह्यात मंगळवारी शुन्य कोरोना पॉझिटिव्ह

गोंदिया : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून आज ७ डिसेंबर रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवीन एकही कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेला नाही. तर आज डिस्चार्ज रुग्णांची संख्या शुन्य आहे.

आजपर्यंत ४१,२३४ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. ४०,५१८ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ८ आहे. ८ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील ५७६ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.६ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.४ टक्के आहे तर डब्लिंग रेट २९३४.६ दिवस आहे. गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेत कोरोना विषाणूच्या तपासणीसाठी आतापर्यंत ४६६८५१ नमूने पाठविण्यात आले. यामध्ये ठ्ढ–झउठ चे २४३२८१ नमूने असून रॅपिड अँटीजेन चाचणी (RAT) चे २२३५७० नमूने आहेत. कोरोना वॉर रूममधून बाधित रुग्णांसाठी २४ तास सेवा उपलब्ध आहे. ज्या रुग्णांना काही समस्या असल्यास त्यांनी ८३०८८१६६६६ आणि ८३०८८२६६६६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

# गोंदियत इट राईस चॅलेंज़ देणार अन्नसुरक्षा

**गोंदिया:** नागरिकांना सुरक्षीत आणि आरोग्यदायी अन्न मिळावे, यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) इट राईस चॅलेंज मोहिम हाती घेण्यात आली आहे. गोंदियात ही मोहिम राबविण्याता येणार आहे. या मोहिमेंतर्गत गोंदियातील हॉटेलांची तपासणी करुन अन्न व औषध प्रशासनाकडून प्री–ऑडिट केल्यानंतर थर्ड पार्टीअंतर्गत ऑडिट केल्यानंतर केले जाणार आहे. त्यानंतर त्या हॉटेलांना हायजिन रेटिंग दिले जाणार आहे.यासंदर्भात जिल्हाधिकारी नयना गुंडे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार(दि.६)जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली.शहरातील ५ ठिकाणांची तपासंणी करुन २७ नमुने अन्न,फळ,भाजीपाल्यासह इतर खाद्यपदार्थांचे या मोहिमेंतर्गत घेण्यात आल्याचे बैठकित माहिती देण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या डट राईट चॅलेजमध्ये गोंदिया जिल्ह्यात काम सुरु झाले आहे. एफडीए कार्यालयांना टास्क देण्यात आले आहेत. ह टास्क पाच टप्प्यांमध्ये विभागले अहेत. अन्न विक्री करणाऱ्या प्रत्येक दुकान, हॉटेलचा परवाना तपासणे, दुकानातील दुध, मसाले, भाज्या, फळे, रवा, पीठ, मैदान, तेल यांचे जवळपास नमुने घेऊन त्यांची तपासणी करणे, एफडीएतील अधिकाऱ्यांना




प्रशिक्षण देणे, त्याचबरोबर खाद्यपदार्थांना वाचण्यांबाबत ग्राहकांना डिसेंबर महिन्यात मार्गदर्शन केले जाणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाचे उपायुक्त ए.पी. देशपांडे यांनी सांगितले आहे.

शाळा, हॉस्पीटल आणि खासगी कार्यालयात इट राईट चॅलेंज राबविण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील शाळा, केटीएस व तिरोडा येथील अदानी समूहाचे कॅन्टीन यांचे प्री–ऑडिट करण्यात आले आहे. चित्रपटगृहे, व्हिडिओ आणि पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे उपायुक्त ए.पी.देशपांडे यांनी दिली.

**फेरीवाल्यांनाही देणार प्रशिक्षण**

गोंदिया जिल्ह्यातील फेरीवाले खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांना प्रशिक्षण, हॉटेल, रेस्टॉरेंट, कॅफे, ढाबा, बेकरी, मिठाई शॉप, मटन–चिकन शॉप अशा शेकडो दुकानांची पाहणी करुन त्यांना स्वच्छता क्रमांक देणे, इसकॉन, स्वामीनारायण मंदिर, सिद्धीविनायक मंदिर, गुरुद्वारा यांच्यामार्फत फेरीवाले, भाजी मार्केट यांना प्रशिक्षण देऊन प्रमाणपत्र देणे, इट राईट चॅलेंज अंतर्गत आशा वर्कर, अंगणवाडी आणि आरोग्य सेविकांनाही प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**गोंदियातील चार–पाच दुकानांना डायजिन रेटिंग**

कुठल्याही हॉटेलात जेवन मिळत असेल तरते अन्न शुद्ध व स्वच्छ असावे, यासाठी अशा हॉटेलांना हायजिंग रेटिंग दिले जाणार आहे. त्या हॉटेलांना स्माईलीयुक्त स्टार असलेले रेटिंग दिले जाणार आहे. यासाठी प्री–ऑडिट झालेल्या गोंदियातील पाच हॉटेल व बेकरीला हायजिंग रेटिंग दिले जाणार आहे.

# कापूस वेचणीचे काम करुन शेतकऱ्याची केली मदत, रेगुंठा पोलिसांचा स्तुत्य उपक्रम

**गडचिरोली:** पोलिस खात्याकडे लोक वेगवेगळ्या नजरेने पाहत असल्याचे अनेकदा दिसून येते. बऱ्याचदा खाकी वदी पाहून तो स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. मात्र तेच गणवेशधारी पोलिस लोकांच्या धावून येतात तेव्हा त्यांच्याकडे पाहण्याचा नागरिकांचा दृष्टिकोनही बदलतो आणि त्यांच्याबद्दल आदराची भावना जागृत होते. असेच काहीसे काम तालुक्यातील रेगुंठा पोलिस स्टेशनच्या पोलिस दलाने केले आहे. एका शेतकऱ्याच्या शेतात चक्क कापूस काढणीचे काम करुन या पोलिसांनी सदर शेतकऱ्याला मदत केली आहे. त्यांचे हे कार्य पाहून परिसरात कौतूक केले जात आहे.

रेगुंठाचे पोलिस २ डिसेंबर दरम्यान आपल्या कर्तव्यावर होते. त्याचवेळी जवळच असलेल्या



कापूस शेतात मधुकर लिंगय्या गडपल्ली (४५) हे शेतकरी त्यांची पत्नी आणि आई मिळून दोन एकर शेतातून कापूस वेचत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत पोलिस ठाण्याचे प्रभारी विजय सानप यांनी जवळ जाऊन शेतकऱ्याला विचारले. तुम्ही मजुरांना कामावर ठेवले नाही का? अशी विचारणा केल्यानंतर शेतकऱ्याने मजूर मिळत नसल्याचे सांगत त्यांची मजुरी देण्याची ऐपतही नसल्याचे सांगितले. कपाशीच्या झाडांची फळे फुटू लागल्याने वाऱ्याने त्यातील कापूस काही प्रमाणात उडत असल्याने नुकसान होत असल्याचे त्याने सांगितले. शेतकऱ्याची ही कहाणी ऐकून पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानंतर एरिया वर्चस्वावरील पथकासह शेतात जाऊन सुमारे ३ ते ४ तासांच्या अथक परिश्रमानंतर दोन एकर लागवडीत गुंतलेला कापूस वेचून त्या शेतकऱ्याकडे सुपूर्द केला.

पोलिस विभागाच्या या सहकार्याने शेतकऱ्याला त्याच्या शेतातील कापूसही मिळाला व सोबतच मजुरांची मजुरीही वाचली. पोलिस स्टेशनचे प्रभारी आणि पथकातील सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या या सहकार्यामुळे शेतकरी मधुकर गडपल्ली आणि त्यांच्या पत्नीचा चेहरा फुलला. त्यांनी पोलिस दलाचे आभार मानले. पोलिसांच्या अशा मानवसेवा आणि सामाजिक कार्यामुळे लोकांचाही या विभागाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आणि तेही खाकी वदीला आपले हितचिंतक मानू लागले असून पोलिसांच्या या कार्याचे कौतूक केले जात आहे.